# प्रेस नोट

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी मनपा शाळांमध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच RTE २००९ अंतर्गत ही शाळांमध्ये शासनाद्वारे शिक्षणाची सोय उपलब्ध केलेली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळांमध्ये मराठी माध्यमाच्या-२१, हिंदी माध्यमाच्या-५, गुजराती माध्यमाच्या -५ व उर्दु माध्यमाच्या -५ शाळा असुन सदर शाळांमध्ये सुमारे ६४२९ विदयार्थी लाभ घेत आहेत. कोव्हीड - १९ च्या अनुशंगाने शाळांद्वारे ऑनलाईन शिक्षण उपलब्ध करुन देण्यात आले आहे. शाळांच्या फी संदर्भात व ऑनलाईन शिक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत.

सन २०१९-२० या शालेय वर्षात भरलेल्या फी एवढीच फी २०२०-२१ या कोरोना काळातील शालेय वर्षात भरली पाहिजे असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सोबतच फी भरु न शकल्यामुळे कुठल्याही विद्यार्थ्यांचे नाव शाळेतून काढता येणार नाही असेही सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काही संस्था, व्यक्ती पालकांची दिशाभूल करुन शाळांच्या फीमध्ये पूर्णपणे माफी मिळत असल्याचे पालकांना सांगत आहेत व फी आकारणाऱ्या शाळांविषयी शिक्षण विभाग व मनपा प्रशासन कोणतीही कार्यवाही करत नसल्याचा गैरसमज निर्माण करत असून जनमानसात प्रशासनाची प्रतिमा मलिन करत आहेत.

सबब सदर संस्था, व्यक्ती यांपासून पालकांनी सावध राहावे असे आवाहन शिक्षण विभाग व मनपा प्रशासनाद्वारे करण्यात येत आहे. तसेच मनपाच्या शाळांमध्ये उपलब्ध शिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन करणेत येत आहे. त्याचप्रमाणे शिक्षण विभाग व मनपा प्रशासन याविषयी दिशाभूल करणाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करणेत येईल याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**(संभाजी पानपटटे)**
**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**